# नगर परिषद कार्यालय चांदुर रेल्वे, जि. अमरावती

## ई-निविदा सुचना (द्वितीय वेळ)

**बांधकाम विभाग जा. क्र . ६०६ll न.प.चां.रे./ /२०२६** दि. :14 /05 /२०२६

मुख्याधिकारी नगर परिषद चांदूर रेल्वे यांच्या वतीने खालील दोन लिफाफा पद्धतीने ई-निविदा पद्धतीने नोंदणीकृत योग्यत्या पंजीबद्ध प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कडून ई-निविदा मागविण्यात येत आहे. खालील कामाची निविदा केवळ ई-निविदा सादर करायची आहे. विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक / /२०२६ रोजी वाजेपासून पहावयास उपलब्ध आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | निविदा मूल्य रुपये | निविदे सोबत भरावयाची इसारा रक्कम | निविदा प्रपत्र फी | काम पूर्ण करावयाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरिता करिता विविध योजने अंतर्गत करावयाच्या कामाचे नकाशे व अंदाजपत्रक तथा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे व कामाची देखरेख करणे यासाठी सल्लागार पॅनल नियुक्त करणे.(महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान वगळून) (Empanelment) | वेळोवेळी देण्यात येणाऱ्या कामाचे आदेशानुसार | रु.२५,०००/- | रु.२०००/- | ३१ मार्च २०२७ पर्यंत |

**ई-निविदा प्रक्रियेचा तपशिलः-**

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिद्धी दिनांक | दि.:-14/05/26, दु ५.०० वाजता |
| ई-निविदा व दस्ताऐवज डाऊनलोड दिनांक | दिनांक :- 14/05/26 ; दु ५.०० वाजता ते दिनांक 22/05/26 सांयकाळी ०५:०० वाजता |
| ई-निविदा व कंत्राटदाराचे दस्ताऐवज दाखल करण्याचा दिनांक | दिनांक: 14/05/26 ; दु ५.०० वाजता ते दिनांक 22/05/26 सांयकाळी ०५:०० वाजता |
| ई-निविदा उघडण्याची दिनांक | शक्य झाल्यास दि. 25/05/26 दु ५.०० वाजता किंवा त्यानंतर |

**ई-निविदेच्या अटी व शर्ती**

1. वरील कामाची निविदा प्रक्रिया संगणकावर ई-निविदा प्रक्रियेद्वारे ऑनलाईन करता येईल. या निविदेसंबंधी या पुढील सर्व सूचना/शुद्धीपत्रके शासनाच्या संकेतस्थळ https://www.mahatenders.gov.in यावर पहावयास मिळतील.
2. सदर कामाच्या निविदा बाबत खालील बाबी आवश्यक राहतील.

A. सदर ई-निविदा भरण्यासाठी https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळाचा उपयोग करावा,

B.निविदाधारकाने निविदा अनामत रक्कम व निविदा प्रपात्राची किंमत निविदा भरत असतांना ऑनलाईन पद्धतीने भरणा करावी. म्हणजे फक्त ऑनलाईन पद्धतीने भरणा केलेली निविदा स्वीकारल्या जाणार आहे. ऑनलाईन पद्धतीने भरणा करणे करिता कंत्राटदारांकडे नेट बँकिंग असणे आवश्यक आहे. सदर कामाकरिता joint venture ची निविदा स्वीकारण्यात येणार नाही.

C. कोणताही सक्षम कंत्राटदार निविदेतील अटी व शर्तीची पूर्तता करतील ते पात्र असतील तसेच महाराष्ट्र शासन अंतर्गत नोंदणीकृत योग्य त्या वर्गातील वैध नोदणी प्रमाणपत्राची मुळ प्रत / जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र/ आयकर/नोंदणी व भरणा प्रमाणपत्र, मागील पाच आर्थिक वर्षामध्ये काम पूर्ण केल्याचे/कार्यादेशाचे प्रमाणपत्र पॅनकार्ड स्कॅन करून अपलोड करावी लागेल.

D. उपलब्ध मनुष्यबळ / तांत्रिक कर्मचारी यांची कागदपत्रासह स्कॅन करून यादी अपलोड करावी लागेल.

1. नोदणीकृत वास्तुविशारद असणे आवश्यक आहे. 2. स्थापत्य अभियंता

E. निविदा प्रपत्रातील Declaration of the Contractor विहित नमुन्यातील (Appendix - A) कंत्राटदाराने स्कॅन करून अपलोड करावी. तसेच हितसंबध नसल्याबाबतचे परिशिष्ट "अ" व काळ्या यादीत नाव नसल्याचे प्रतिज्ञापत्र (रु.५००) च्या मुन्द्रांक पेपरावर स्कॅन करून अपलोड करावे.

F. निविदा प्रपत्रातील सविस्तर निविदा सुचनेमधील मधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारास बंधनकारक राहतील.

G. वरील कामाबाबत निधीचे उपलब्धतेनुसार पार पाडलेल्या कामाचे देयक अदा करण्यात येईल ह्या कारणामुळे झालेल्या विलंबाबाबत कोणत्याही प्रकारचा व्याज देण्यात येणार नाही व याबाबत कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही.

H. मुदतवाढ देण्याचा अधिकार न.प. चांदूर रेल्वे सर्वसाधारण सभेला राहील.

I.किमान पाच वर्ष नगर पंचायत/नगरपरिषद/महानगरपालिकेचा वास्तुविशारद / अभियंता म्हणून काम केल्याचा अनुभव असणे अनुभव आवश्यक राहील त्याबाबतचे कागदपत्र प्रमाणपत्रे लिफाफा क्र. ०१ मध्ये जोडणे आवश्यक राहील.

J. लगतच्या २ वर्षाचे तसेच चालू वित्तीय वर्षाचे आयकर क्लिअरन्स (ITR)

K. सा.बां.वि. सीएटी / २०२२.प्र.क्र.५०/इमा-२ दि. ११ मे २०२२ नुसार निविदेसोबत सादर केलेले सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ठ- १) १००/ रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर निविदा काळातील) कामाच्या नावासहित लिफाफा क्र.१ मध्ये जोडणे बंधनकारक आहे.3. हे प्रकल्प अहवाल तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार शुल्क प्रदान करणे बाबतचे टप्पे खालील प्रमाणे विहित करण्यात येत आहे

| अ.क्र. | प्रकल्पाच्या / कामाचा प्रगतीचा टप्पा | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्काचे प्रदानाचे प्रमाण (प्रकल्प किमतीच्या प्रमाणात) | |
|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नागरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रकल्प साठी | इतर सर्व कामांसाठी |
| 1 | प्रकल्पाचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर | ०.७५ टक्के (डीपीआर ०.५० टक्के /प्र.मा. ०.२५ टक्के) | ०.५० टक्के (डीपीआर ०.३३ टक्के प्र.मा. ०.१७ टक्के) |
| 2 | प्रकल्पाचे कामाचे कार्यादेश देल्यानंतर | ०.२५ टक्के | ०.१६ टक्के |
| 3 | प्रकल्पाचे २५ टक्के काम पूर्ण झाल्यानंतर | ०.४० टक्के | ०.२७ टक्के |
| ४ | प्रकल्पाचे ५० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर | ०.४० टक्के | ०.२७ टक्के |
| 5 | प्रकल्पाचे ७५ टक्के काम पूर्ण झाल्यानंतर | ०.६० टक्के | ०.४० टक्के |
| ६ | प्रकल्पाचे प्रकल्पाचे १०० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर | ०.६० टक्के | ०.४० टक्के |
| | एकूण - | ३.०० टक्के | २.०० टक्के |

4. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करणे, शुल्क व त्याचा प्रदानाबाबत या विषयाच्या नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१८/प्र.क्र५४/नवि१६ मंत्रालय मुंबई-४०००३२ दिनांक ०४/०६/२०१८

मधील मुद्दा क्र. ०३ मध्ये नमूद व विहित दराची मर्यादा ओलांडता येणार नाही.5. सदर कामाची निविदा उघडण्याचे दिनांकापासून पुढील ३१ मार्च २०२७ विधीग्राह्य राहील.6. लावण्यात आलेल्या निविदांचे किमतीनुसार रु. १०.०० लक्ष पर्यंत ५००/- व त्यावरील प्रत्येक लाखाच्या भागास १००/- या प्रमाणे येणार असल्यास रक्कमेचे राजमुद्रांकावर (स्टॅम्प पेपर) वर कामाचा करारनामा करून देणे बंधनकारक राहील.

7.सदर कामास दरवाढ लागू असणार नाही. बालकामगार कामावर ठेवता येणार नाही.

8.सदर कामाची निविदा मंजूर झाल्यानंतर नियमानुसार शासकीय कपाती करण्यात येतील.

9. सदर निविदेतील कामाबाबत कोणतेही कारण न देता कोणतेही अथवा सर्वच निविदा नाकारण्याचा हक्क नगर परिषदेने राखून ठेवलेले आहे.10.निविदेमध्ये पदाधिकारांचा सहभाग नसल्याचे प्रतिज्ञापत्र परिशिष्ट अ प्रमाणे करावे लागेल.

11.कामाचा कमाल अनुभव असलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना प्राधान्य देण्यात येईल.

12.कामाबाबत काही वाद निर्माण झाल्यास आर्बीटेटर नियम १९९६ नुसार मधील तरतुदीनुसार नगर परिषद नियुक्त आर्बीटेटरच्या निर्णय मान्य करावा लागेल तसेच याबाबत कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही.

13. विविध कामाचे विविध योजने अंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करावयाचे असल्यास त्याबाबत वेगवेगळे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात येतील. तसेच त्याबाबत शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतरच नियमानुसार देयक प्रदान करण्यात येतील.

14.वरील कामाबाबत निधीचे उपलब्धतेनुसार पार पडलेल्या कामाचे देयके अदा करण्यात येईल. या कारणामुळे विलंबना बाबत कोणत्याही प्रकारचा व्याज, व दावा एकल्या जाणार नाही. तसेच आर्बीटेटरचा निर्णय अंतिम राहील.

15.निविदाकाराने सदर कामाची ऑनलाइन सादर केलेली कागदपत्रे व निविदा दस्तावेज ७२ तासाच्या आत स्वसाक्षांकित करून नगर पंचायत कार्यालयास सादर करावे.

16.योजने मधील विकास कामाचे देखरेख करणे निविदा कार्यालयीन टिप्पणी, देयकाची टिप्पणी, मोजमाप पुस्तिका लिहिणे, बांधकामबाबत लेखा आक्षेपाची पूर्तता करणे व इतर अनुषंगिक कामे निविदाकारामार्फत करावयाचे असल्यास मुख्याधिकारी नगर परिषद चांदूर रेल्वे यांचे लेखी आदेश घेऊन करावेत. लेखी आदेश न घेता कुठल्याही कामची देखरेख करता येणार नाही व उर्वरित कामाच्या देखरेखीबाबतचे शुल्क अ. क्र 3 मधील मुद्दा क्र 1 ते ६ नुसार नमुद केलेले सुद्धा अदा करण्यात येणार नाही. कामाची देखरेख करत असतांना कामाची गुणवत्ता राखणे, कामाचे साईट वर साहित्याची आवश्यक machinaries द्वारे तपासणी करणे, trail pits घेणे व अदाजपत्रकाच्या मानकाप्रणे काम कंत्राटदाराकडून करून घेण्याची संपूर्ण जबाबदारी सल्लागाराची राहील.

17.नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र५४/नवि१६ मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक ०४/०६/२०१८ मधील परिच्छेद क्र.६ नुसार प्रकल्प अहवाल तयार करण्यासासाठी महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान करिता ०.५०% व ईतर योजनेकरिता ०.३३% पेक्षा जास्त शुल्क अदा न करण्याचे निर्देश असल्याने सदर बाबतीत कामाची प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित झाल्यावर महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान करिता ०.७५% (०.५०-०.२५) व ईतर योजनेकरिता ०.५०% (०.३३-०.१७) इतके किव्वा निविदा रकमेनुसार कमी शुल्क सल्लागारास अदा करण्यात येईल. प्रकल्पाचे/कामाचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यशिवाय कुठलेही देयक सल्लागारास अदा करण्यात येणार नाही. याची सर्व निविदाकारांनी नोंद घ्यावी.

18.सदर कामाकरिता सल्लागार पॅनल नियुक्त करणे (Empanelment) आवश्यक असल्याने एकापेक्षा अधिक निविदाकारास L१ च्या दरात नगरपरिषदेस सल्लागार पॅनल म्हणून (Empanelment) काम करता येईल परंतु सदर सल्लागारास L१ प्रथम देकाराच्या निविदाकाराच्या दारात काम करणे बंधनकारक राहील. सदर सल्लागार म्हणून नियुक्त होणेकरिता सर्व निविदाकारांना लेखी कळविल्या जाईल यानंतर सल्लागार पॅनल नियुक्त केल्या जाईल व सदर पॅनल वरील कोणत्याही निविदाकारास कार्यारंभ आदेश देण्याचा अधिकार हा मुख्याधिकारी यांचा राहील.19.सर्व किंवा कोणतीही निविदा सशर्त नाकारण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांना राहतील.

20.अटी व शर्ती शिथील करण्याचे अथवा नव्याने समाविष्ट करण्याचे अधिकार मुख्याधिकारी न. प. चांदुर रेल्वे यांना राहतील.

21. कामासंबंधीत तसेच निविदा प्रकियेसंदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास मुख्याधिकारी न. प. चांदूर रेल्वे यांचा निर्णय अंतिम राहील.

(सुप्रिया टवलारे)
मुख्याधिकारी
नगर परिषद चांदूर रेल्वे

Signature Not Verified
Digitally signed by Kirti Madhukar Jawale
Date: 2026.05.14 13:35:45 IST
Location: Maharashtra-MH